उस्मानाबाद जिल्ह्यातील साखर कारखान्यांचे आर्थिक विकासातील योगदान : एक भौगोलिक अभ्यास

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्य विद्याशाखेअंतर्गत भूगोल विषयातील पीएच.डी. (विद्यावाचस्पती)

या पदवीकरिता सादर केला जाणारा संशोधन आराखडा

संशोधक

सुशीलकुमार माधव कांबळे

(एम.ए.)

मार्गदर्शक

प्रा.डॉ. यु.टी. गायकवाड

भूगोल विभागप्रमुख

सुशीलादेवी देशमुख महिला महाविद्यालय, लातूर

संशोधन केंद्र

महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर

मार्च २०२२

उस्मानाबाद जिल्ह्यातील साखर कारखान्यांचे आर्थिक विकासातील योगदान : एक भौगोलिक अभ्यास

प्रस्तावना

भारत हा प्राचीन काळापासून कृषिप्रधान देश म्हणून ओळखला जातो. आजही भारतात ६५ टक्के पेक्षा जास्त लोकसंख्या कृषी व्यवसायात गुंतलेली आहे. त्यामुळे भारताची अर्थव्यवस्था कृषीप्रधान अर्थव्यवस्था म्हणून जगात सर्वपरिचित आहे. भारतातील बहुसंख्य लोकसंख्या कृषीशी निगडित व्यवसायांवर प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरित्या अवलंबून असल्यामुळे शेती व्यवसायात दिवसेंदिवस बदल होत आहेत. साखर उद्योग हा प्राचीन काळापासून अस्तित्वात होता. प्राचीन काळी मध आणि ऊस या दोन पदार्थांपासून साखर आणि गुळ तयार करण्यात येत होता. भारतात ऊसाचे उत्पादन जास्त होते. म्हणून भारताला ऊसाचे माहेरघर असे म्हणतात.

साखर उद्योगामुळे विविध क्षेत्रात रोजगार उपलब्ध होत असतात. कारखान्यात काम करणारे कामगार ऊस उत्पादनात गुंतलेले कामगार, साखर कारखान्यांना लागणारी यंत्रसामुग्री निर्माण करणारे उद्योग, वाहतूक व विविध सेवा क्षेत्रातील कामगार, ऊसतोड कामकार वगैरे क्षेत्रात अनेकांना रोजगार उपलब्ध झालेले आहेत. या उद्योगातील दुय्यम उत्पादनाचा इतर उद्योगांमध्ये कच्चा माल म्हणून उपयोग केला जातो. उदा : अल्कोहोल, कागद इत्यादींच्या उत्पादनाकरिता लागणारा कच्चा माल साखर उद्योगातून प्राप्त केला जातो. भारतीय अर्थव्यवस्थेत साखर उद्योगाला महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. कारण साखर उत्पादन मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे साखरेच्या निर्यातीमुळे परकीय चलन प्राप्त होत आहे. या बाबीचा विचार करता या उद्योगाचे भारतीय औद्योगिक क्षेत्रातील महत्त्वाचे स्थान लक्षात येते.

उस्मानाबाद जिल्ह्याच्या अर्थव्यवस्थेत कृषीचे महत्त्व लक्षात घेऊन जिल्ह्याच्या विकासामध्ये साखर उद्योगाची मदत कशा प्रकारे झालेली आहे याचा अभ्यास प्रस्तुत शोधनिबंधात केला जाणार आहे.

अभ्यासक्षेत्र

उस्मानाबाद जिल्हा महाराष्ट्र राज्याच्या दक्षिण भागात व मराठवाड्यात त्याच्या नैऋत्येला आहे. या जिल्ह्याचे अक्षवृत्तीय स्थान १७°३५' ते १८°४०' उत्तर अक्षवृत्त व ७५°१६' ते ७६°४०' पूर्व रेखावृत्त यांच्या दरम्यान आहे. उस्मानाबाद जिल्ह्याच्या नैऋत्येला सोलापूर जिल्हा, वायव्येला अहमदनगर जिल्हा, उत्तरेला बीड जिल्हा, पुर्वेला लातूर जिल्हा व दक्षिणेला कर्नाटकातील बिदर व गुलबर्गा हे जिल्हे आहेत.

उस्मानाबाद जिल्हा समुद्रसपाटीपासून ६०० मी. उंचीवर असून पूर्णपणे दख्खनच्या पठारात येतो. या जिल्ह्यात मांजरा आणि तेरणा नद्यांची पात्र येतात. जिल्ह्याचे एकूण भौगोलिक क्षेत्रफळ ७५६९ चौ.कि.मी. असून २०११ च्या जनगणनेनुसार १६,६०,३११ एवढी लोकसंख्या आहे. महाराष्ट्र राज्याच्या तुलनेत उस्मानाबाद जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येचे प्रमाण १.४५ टक्के आहे. प्रशासकीय दृष्टीने हा जिल्हा आठ तहसीलमध्ये विभाजित झालेला आहे.

संशोधनाची उद्दिष्टये

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने काही उद्दिष्टांची मांडणी पुढीलप्रमाणे करण्यात येईल.

१) उस्मानाबाद जिल्ह्यातील साखर कारखान्यांचा अभ्यास करणे.

२) उस्मानाबाद जिल्ह्यातील साखर कारखान्यांच्या वितरणाचा अभ्यास करणे.

३) उस्मानाबाद जिल्ह्यातील साखर कारखान्यांनी शेतकऱ्यांसाठी उपलब्ध करून दिलेल्या विविध विकास विषयक योजनांचा अभ्यास करणे.

४) उस्मानाबाद जिल्ह्यातील साखर कारखान्यांमुळे आर्थिक क्षेत्रात, शेतकऱ्यांच्या आर्थिक परिस्थितीत झालेल्या बदलांचा अभ्यास करणे.

५) उस्मानाबाद जिल्ह्यातील साखर कारखान्यांपुढील समस्यांचा अभ्यास करणे.

६) उस्मानाबाद जिल्ह्यातील साखर कारखान्यांचे आर्थिक विकासातील योगदान

संशोधनाची गृहितके

प्रस्तुत संशोधनासाठी खालील गृहितके निश्चित करण्यात येणार आहेत.

१) उस्मानाबाद जिल्ह्याच्या आर्थिक बदलात कारखान्यांची भूमिका महत्त्वाची आहे.

२) साखर कारखाने शेतकऱ्यांच्या विकासासाठी विविध विकास योजना उपलब्ध करून देतात.

३) उस्मानाबाद जिल्ह्यातील ग्रामीण भागात व शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीत साखर कारखान्यांमुळे सुधारणा होतात.

४) उस्मानाबाद जिल्ह्यातील साखर कारखान्यांपुढे अनेक समस्या आहेत.

आकडेवारीचे संकलन/आधार सामुग्री

उस्मानाबाद जिल्हा-सामाजिक व आर्थिक समालोचन, भारतीय जनगणना अहवाल, जिल्हा सांख्यिकीय विभाग, जिल्हा कृषी कार्यालय, सर्वेक्षण प्रश्नावली पद्धत व मुलाखती तंत्र, साखर कारखाने कार्यालयीन विभाग यांच्याकडून प्राप्त झालेली प्राथमिक माहिती ही सर्वेक्षण मुलाखती आणि अधिकारी यांच्याकडून चर्चेच्या आधारे घेतली जाणार आहे.

दुय्यम स्वरूपाची माहिती ही सामाजिक व आर्थिक समालोचन, जनगणना अहवाल, जिल्हा सांख्यिकीय विभाग व कृषी कार्यालयाकडून संकलित करण्यात येणार आहे.

अभ्यास पद्धती

संबंधीत संशोधानात उस्मानाबाद जिल्ह्यातील आर्थिक स्थितीचा आढावा घेण्यासाठी संशोधनाच्या विविध पद्धतींपैकी सर्वेक्षण पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे. सर्वेक्षण पद्धतीच्या निवडीमुळे संशोधकास प्रत्यक्ष प्रदेशाशी संबंध प्रस्थापित करता येईल. त्यामुळे उस्मानाबाद जिल्ह्यातील आर्थिक विकासात कोणकोणते परिवर्तन घडून आलेले आहे याची माहिती मिळेल. तसेच साखर कारखान्याच्या परिणामाचा किंवा प्रभावाचा जिल्ह्यातील आर्थिक व मूलभूत घटकांवर कोणता परिणाम होत आहे याचा शोध घेता येईल.

सर्वेक्षण संशोधन पद्धतीच्या निवडीमुळे संशोधकाचा प्रत्यक्ष क्षेत्राशी संबंध येतो. त्यामुळे सर्वेक्षणाद्वारे उपलब्ध झालेल्या माहितीच्या आधारे काढलेले निष्कर्ष वास्तव्यावर आधारलेले व विश्वसनीय असतात. संशोधनातील सर्वेक्षण पद्धतीत पूर्णपणे वैज्ञानिक पद्धतीचा वापर केला जातो. त्यामुळे मिळालेले निष्कर्ष शुद्ध व सुक्ष्म स्वरूपाचे असतात. त्यामुळे संशोधकाने या संशोधनासाठी सर्वेक्षण संशोधन पद्धतीचा वापर केला आहे.

विषय निवडीची आवश्यकता

उस्मानाबाद जिल्हा महाराष्ट्रातील एक कृषी विकासामध्ये महत्त्वपूर्ण जिल्हा असून तो कृषीमध्ये नवनवीन तंत्रज्ञानाचा प्रयोग करण्यास प्रचलित आहे. साखर उद्योग भारतातील विविध प्रमुख उद्योगांपैकी एक उद्योग होय. जगातील निम्मे देश ऊसापासून साखर उत्पादन घेतात. त्यात भारताचा जगात पहिला क्रमांक लागतो. भारतातील कृषी आधारित उद्योगधंद्यामध्ये साखर उद्योगाचा दुसरा क्रमांक लागतो. या उद्योगांमुळे विविध क्षेत्रात रोजगार निर्माण झालेले आहेत.

उस्मानाबाद जिल्ह्यातील ऊस उत्पादन वाढल्याने वेगवेगळ्या भागात साखर उद्योगांची स्थापना करण्यात आली आहे. सिंचन विरहीत जमिनीवर देखील शेतकऱ्यांकडून आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून ऊस उत्पादन वाढविण्याचा

जास्तीत जास्त प्रयत्न होत आहे. वरील घटकांचाच विचार करून संशोधनासाठी "उस्मानाबाद जिल्ह्यातील साखर कारखान्यांचे आर्थिक विकासातील योगदान : एक भौगोलिक अभ्यास" या विषयाची निवड करण्यात आलेली आहे.

साहित्याचे पुनरावलोकन

सदरील संशोधनासाठी खालील संशोधन कार्याचा आढावा घेण्यात आलेला आहे.

१) श्री.कामत जी.एस. (१९६५)

यांनी "महाराष्ट्रातील सहकारी साखर उपक्रमाच्या व्यवस्थापनाचा अभ्यास" या विषयावर संशसोधन केले आहे. त्यांच्या संशोधनाची सहकारी साखर उपक्रमाच्या व्यवस्थापनाचा अभ्यास, व्यवस्थापनापुढील समस्या आणि ग्रामीण विकासावर होणारा परिणाम ही उद्दिष्टे होती.

२) कायंदे गंगाधर (१९९३)

यांनी "विदर्भातील सहकारी साखर उद्योग एक चिकित्सक अभ्यास" या विषयावर संशोधन कार्य केले आहे. त्यांनी भारतीय अर्थव्यवस्थेतील सहकारी चळवळ, महाराष्ट्रातील साखर उद्योग व विदर्भातील साखर उद्योग यांचा अभ्यास, साखर उद्योगाच्या संदर्भात ऊस उत्पादन तोडणी, वाहतूक इत्यादी मूलभूत बाबींचा अभ्यास केला आहे.

३) अग्रवाल के.सी. (१९९४)

यांनी "विदर्भातील आर्थिक विकासात सहकारी साखर कारखान्यांचे योगदान" या विषयावर संशोधन कार्य केले आहे. त्यांच्या संशोधनाच्या उद्दिष्टांमध्ये विदर्भातील साखर उद्योगांचा विश्लेषणात्मक अभ्यास, व्यवस्थापनासमोरील समस्या, साखर कारखान्याने केलेल्या प्रगतीचा आढावा, विदर्भातील कारखान्यांसमोरील अडचणी जाणून घेणे व त्यावर उपाय सुचविणे यांचा समावेश होता.

**४)	प्रा.डॉ.गरड अण्णा ज्ञानदेव (१६ मे २०१९)**

यांनी “नांदेड जिल्हा आर्थिक विकासातील साखर कारखान्यांची भूमिका एक भौगोलिक अभ्यास” या विषयावर संशोधन कार्य केले आहे. यांनी भारतातील, महाराष्ट्रातील विशेषतः नांदेड जिल्ह्यातील साखर उद्योगाचा सखोल व चिकित्सक अभ्यास केला आहे. ऊस उत्पादनासाठी लागणारी मृदा, जलसिंचन, वाहतूक व दळणवळण, विद्युतीकरण व विद्युत पुरवठा या सर्व घटकांचा सखोल अभ्यास केला आहे. साखर उद्योगात येणाऱ्या विविध अडथळ्यांचा सखोल अभ्यास करून त्यावर उपाययोजना सुचविल्या आहेत.

प्रकरण मांडणी

प्रकरण पहिले - संशोधन विषयाची ओळख

- प्रस्तावना
- उद्योगाच्या व्याख्या
- उद्योगाचे वर्गीकरण
- विषय निवडीची आवश्यकता
- अभ्यास क्षेत्र
- अभ्यासाची उद्दिष्टे
- अभ्यासाची गृहितके
- संशोधनाची व्याप्ती व मर्यादा
- माहिती संकलनाचे स्रोत
- संशोधन पद्धती
- संशोधन साहित्याचा आढावा
- प्रकरण मांडणी

प्रकरण दुसरे - उस्मानाबाद जिल्ह्यातील भौगोलिक, आर्थिक व सामाजिक स्थितीचा आढावा

- प्रस्तावना
- स्थान व विस्तार
- प्राकृतिक रचना
- हवामान
- नदीप्रणाली
- मृदा
- वनसंपदा
- जलसिंचन
- पशूधन
- भूमी उपयोग
- लोकसंख्या
- वाहतूक व दळणवळण
- विद्युत पुरवठा
- कारखाने
- शैक्षणिक सुविधा
- वैद्यकीय व आरोग्य सुविधा
- धार्मिक व पर्यटनस्थळे
- सारांश

प्रकरण तिसरे - उस्मानाबाद जिल्ह्यातील साखर उद्योगांचा आढावा

- प्रस्तावना
- साखर उद्योगाचा उद्देश
- साखर उद्योगाच्या स्थान निश्चितीकरणासाठीचे आवश्यक घटक

- उस्मानाबाद जिल्ह्यातील साखर कारखाने

प्रकरण चौथे - उस्मानाबाद जिल्हा : आर्थिक विकास व साखर उद्योग

- प्रस्तावना
- आर्थिक विकासाचे निर्देशक घटक
- साखर कारखान्यांनी राबवलेल्या विकास योजनांचा आढावा
- ग्रामसर्वेक्षण प्रश्नावलीतून प्राप्त झालेल्या माहितीचे विश्लेषण
- शेतकरी प्रश्नावलीतून प्राप्त झालेल्या माहितीचे विश्लेषण
- सारांश

प्रकरण पाचवे - साखर उद्योगापुढील समस्य व शासकीय धोरण

- प्रस्तावना
- साखर उद्योगापुढील समस्या
- ऊसाचा कमी काळाचा गाळप हंगाम
- ऊसाच्या उत्पादनामधील चढउतार
- साखरेचा कमी उतारा
- साखर उत्पादनाची जास्त किंमत
- जुनी यंत्रसामुग्री
- साखरेची खांडसरी व गुळाबरोबर स्पर्धा
- ऊसाचा वाढता उत्पादन खर्च
- साखर कारखान्यांची अपुरी उत्पादन क्षमता
- साखरेचे विक्रमी साठे
- शासकीय थकबाकी धोरण आणि आर्थिक अडचणी
- साखर धोरणावर राजकीय विचारांचा पगडा
- इतर समस्या
- साखर उद्योगासंबंधित कायदे

- शासनाचे साखर धोरण
- सारांश

प्रकरण सहावे - निष्कर्ष, उपाययोजना व शिफारशी

- निष्कर्ष
- साखर कारखान्यांनी राबवलेल्या योजनतून प्राप्त झालेले निष्कर्ष
- ग्रामसर्वेक्षण प्रश्नावलीतून प्राप्त झालेले निष्कर्ष
- शेतकरी प्रश्नावलीतून प्राप्त झालेले निष्कर्ष
- उद्दिष्टपूर्ती
- सारांश
- शिफारशी

संदर्भ

१) सवदी ए.बी. व काळेकर पी.एस. (२००५), आधुनिक भूगोल, प्रगती बुक्स, पुणे, प्रथम आवृत्ती

२) प्रा.डॉ.गरड अण्णा ज्ञानदेव, नांदेड जिलहा आर्थिक विकासातील साखर कारखान्याची भूमिका एक भौगोलिक अभ्यास, अप्रकाशित शोधप्रबंध, १६ मे २०१९

३) विकिपीडिया, गुगल

४) भोई पन व अन्य (२००८), महाराष्ट्रातील ऊस शेती : साखर उद्योगाची सद्यःस्थिती व भावी दिशा, गोडवा अंक, १० ऑक्टोबर २००८

संशोधक
सुशीलकुमार माधव कांबळे

मार्गदर्शक
प्रा.डॉ. यु.टी. गायकवाड